सी.एन.आर.क्र.एम.एच.एस.आय. ०९-०००१७०-२०१६

नियमित दिवाणी दावा क्र. ५६/२०१६

निशाणी क्र. ८९ वरील आदेश

प्रस्ततुचा अर्ज वादी याने प्रतिवादी क्र.४ चे वारस अभिलेखावर आणणेस झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द होवून तशी दुरुस्ती करणेसाठी दाखल केला आहे.

२. वादीने आपल्या अर्जात असे कथन केले आहे की, दाव्यातील प्रतिवादी क्र.४ सत्यवती लवू पाटकर पुर्वाश्रमीची सत्यवती गणपत तेली उर्फ कुवळेकर ही दि.१३/१०/२०२३ रोजी मयत झाली आहे. सदर दाव्याचे कामी प्रतिवादी क्र.४ चे वारस हे आवश्यक पक्षकार असून त्यांना या दाव्याचे कामी सामील करणे आवश्यक व जरुरीचे आहे. तरी त्यांच्या विरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द करणेत यावा अशी वादीने विनंती केली आहे.

३. प्रतिवादीने प्रस्तुत अर्जावर म्हणणे दाखल करुन विरोध दर्शविला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार सदर अर्जातील कारणे ही खोटी व खोडसाळ असून सदरचा अर्ज फेटाळण्यात यावा अशी विनंती प्रतिवादीने केली आहे.

४. वादी व प्रतिवादी यांच्यातर्फे विद्वान विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. या ठिकाणी हे नमूद करणे आवश्यक आहे की, वादीने निशाणी क्र.९३ च्या यादी सोबत मयत प्रतिवादी क्र.४ चा मृत्यूचा दाखला हजर केला आहे. सदरच्या मृत्यू दाखल्याचे अवलोकन केले असता, प्रतिवादी क्र.४ सत्यवती लवू पाटकर या दि.१३/१०/२०२३ येथे मयत झाल्याचे दिसून येते. प्रस्तुतचा अर्ज वादीने उशिराने दाखल केलेला आहे. प्रस्तुतचा दावा हा वाटपासाठी दाखल केलेला आहे. मात्र न्यायालयास परिणामकारक व परिपुर्ण निवाडा करताना व वादी, प्रतिवादी यांच्यामध्ये असलेले वादाचे संपुर्ण निराकरण एकाच दाव्यामध्ये होणेसाठी न्यायतत्वाच्या दृष्टीकोनातून प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

– **आदेश** –

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादीने प्रतिवादीला रक्कम रुपये २००/– देण्याच्या अटीवर मयत प्रतिवादी क्र.४ विरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द करण्यात येत आहे.

NANDA BAPUSO GHATAGE
Digitally signed by NANDA BAPUSO GHATAGE
Date: 2024.07.23 15:15:50 +0530

( श्रीमती एन.बी.घाटगे )

दिनांकः २२/०७/२०२४ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर देवगड.